JobsJaano


# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)**

32 वा, मजला, सेंटर-1 बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई - 400005.

दुरध्वनी - (022) 22151824, फॅक्स - (022) 22151867

ई मेल - info.mahasecurity@maharashtra.gov.in, Website : http://www.mahasecurity.gov.in/


## 7000 पुरूष सुरक्षा रक्षकांची [कंत्राटी] प्रतीक्षाधीन यादीसाठी जाहिरात

**[अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख 10/03/2020 सायं 17.00 वाजेपर्यत]**

**[अर्जाचे प्रक्रिया शुल्क रु. 250/- (Non Refundable)]**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, **कंत्राटी पध्दतीवर** तसेच खालील अटी व शर्तीवर **7000 पुरूष सुरक्षा रक्षकांच्या** प्रतीक्षाधीन यादीकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

### पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती

| अ. क्र. | निकष | उमेदवार |
|---|---|---|
| 1 | वयोमर्यादा | 18 ते 28 वर्षे [31/01/1992 ते 31/01/2002 दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र] |
| 2 | शैक्षणिक पात्रता | उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा HSC [12 वी] पास. |
| 3 | अधिवास निकष | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 4 | भरती परिक्षा [100 गुण] | 12 वी च्या गुणांचे भार प्राधान्यानुसार 50 गुण व शारिरीक चाचणीकरीता 50 गुण असतील. |
| 5 | **12वी च्या गुणांचे भार प्राधान्य** [First attempt] [Weightage] | 12वी परिक्षेत 70% पेक्षा अधिक गुण - 50 गुण<br>12वी परिक्षेत 60% ते 70% गुण - 40 गुण<br>12वी परिक्षेत 50% ते 60% गुण - 30 गुण<br>12वी परिक्षेत 40% ते 50% गुण - 10 गुण<br>12वी परिक्षेत 40% पेक्षा कमी गुण - 00 गुण |
| 6 | शारिरीक चाचणी | 1600 मीटर धावणे. [50 गुण]<br>5 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - 50 गुण<br>5 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त परंतु 5 मि. 30 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - 40 गुण<br>5 मि. 30 सेकंदापेक्षा जास्त परंतु 5 मि. 50 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - 20 गुण<br>5 मि. 50 सेकंदापेक्षा जास्त परंतु 6 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - 10 गुण<br>6 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त - **00 गुण [अपात्र]** |
| 7 | उंची, वजन / छाती | 1. उंची - 170 से.मी. पेक्षा कमी नसावी.<br>2. वजन - 60 कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे.<br>3. छाती - न फुगवता 79 से.मी. वा जास्त.<br>फुगवून - किमान 5 से.मी. [Expansion] |
| 8 | कंत्राटानुसार मोबदला | 1] मासिक रु. 17,000/-<br>2] अधिक 12% EPF - Employer Contribution<br>3] हत्यारी सुरक्षा रक्षकांकरीता रु. 1000/- अतिरिक्त हत्यारी भत्ता.<br>4] प्रत्येक वर्षी 1 नविन युनिफॉर्म |

2. **अटी व शर्ती**

2.1. कर्तव्य - सुरक्षा रक्षक म्हणून महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी काम करण्यास इच्छुक उमेदवारांनीच अर्ज करावेत.

2.2. सदरचे कर्तव्य हे कायमस्वरुपी कंत्राटी स्वरुपाचे राहील. सुरक्षा रक्षकांबरोबरच्या कंत्राटास भविष्यात कधीही **स्थायी** स्वरुप येणार नाही.

2.3. कंत्राटा दरम्यान सुरक्षा रक्षकास कोणत्याही राजकीय, कामगार अथवा व्यवसायिक संघटनेचा [Union] सदस्य होता येणार नाही, अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच वर नमुद अथवा इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कामकाजात भाग घेता येणार नाही.

2.4. महामंडळाकडे सुरक्षेची मागणी करणाऱ्या आस्थापना [Clients] यांच्या मागणी नुसार कर्तव्य देण्यात येईल.

2.5. कोणत्याही उमेदवाराचे कंत्राट, कोणत्याही दिवशी, कोणतीही पूर्व सुचना तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा [Terminate] हक्क महामंडळाकडे राहील.

3. उमेदवारांना चाचणीस येणेसाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.
4. सुरक्षा रक्षकांना महामंडळासोबतच्या करारात असतांना इतर कोणतीही नोकरी अथवा धंदा, [पुर्णवेळ किंवा अंश कालीन] करता येणार नाही.
5. महामंडळाबरोबर कंत्राट झाल्यानंतर उमेदवारांस राज्य कामगार विमा योजनेचे / कामगार भविष्यनिर्वाह निधी [ESIC/EPF] लाभ देय होतील.
6. उमेदवारांची नेमणुक ही चारित्र्य पडताळणी व तंदुरुस्त वैद्यकिय प्रमाणपत्राच्या अधिन राहून करण्यात येईल.
7. पात्र व इच्छुक उमेदवारांनी http://www.mahasecurity.gov.in/recruitment.php या वेब - लिंकवर online अर्ज भरावा.
8. ही जाहिरात आणि अर्जाचा नमुना www.mahasecurity.gov.in या वेबसाईटवर Recruitment या tab मध्ये उपलब्ध आहे. अर्ज करण्याची अंतीम तारीख व वेळ ही दि.10/03/2020 रोजी 17.00 पर्यंत आहे.
9. अर्जासोबत भरावयाचे प्रक्रिया शुल्क रू. 250/- (Non Refundable) हे अर्जात नमूद Cash (Bank Details :- HDFC BANK LTD., HDFC CURRENT A/C No. 50200029300297, BRANCH - CHURCHGATE INDUSTRY HOUSE, CHURCHGATE MUMBAI, IFSC CODE- HDFC0000501 MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION) NEFT द्वारे अथवा Online Payment gateway वरून कोणत्याही Debit Card / Credit Card द्वारे अथवा Net Banking Option द्वारे करणे आवश्यक राहील.
10. <u>प्रतिक्षाधीन यादी</u> :- उमेदवारांचे मैदाणी चाचणी मधील गुण व बारावी परिक्षेतील प्राप्त गुणांच्या Weightage च्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रतीक्षाधिन यादी तयार करण्यात येईल. सदरबाबतची प्रतीक्षाधिन यादी www.mahasecurity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
    - 10.1 मैदानी चाचणी व शैक्षणिक गुणानुसार तात्पुरती प्रतिक्षाधीन यादी तयार करण्यात येईल.
    - 10.2 प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांची नियुक्ती कंत्राटी स्वरूपाची असेल.
    - 10.3 जाहिरातीतील नमूद पदांची संख्या महामंडळाच्या आदेशाच्या अधीन असेल. तसेच प्रतिक्षाधीन यादीमध्ये वाढ/घट करणे, वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार महामंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहे.
    - 10.4 प्रतिक्षाधीन यादीत चयन होणे म्हणजे Appointment नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
    - 10.5 प्रतिक्षाधीन यादीतील उमेदवारांना महामंडळाच्या आवश्यतेनुसार प्रशिक्षणाकरिता तसेच नेमणुकीकरिता पाचारण करण्यात येईल.
11. **सदर भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांस काही इजा / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील. यासाठी महामंडळ कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.**
12. महामंडळाची भरती प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत आहे आणि निवड केवळ उमेदवारंच्या गुणवत्तेवर आधारीत आहे.
13. महामंडळाचे अधिकृत संकेतस्थळ आणि वृत्तपत्रे मधील जाहिरातींवरच विश्वास ठेवा.
14. महामंडळामध्ये नोकरी मिळविण्याच्या खोट्या आश्वासनानी प्रभाव, पैसा अथवा इतर कोणत्याही अनुचित मार्गाने फसवणूक करणाऱ्या दलालांपासून सावध रहा.
15. लाच देणे अथवा घेणे गुन्हा आहे.
16. अनुचित प्रकारांमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल आणि त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
17. केवळ गुणवत्तेमुळे तुम्हाला महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळात नोकरी मिळू शकते.
18. जर कोणी आपल्याला महामंडळामध्ये नोकरी मिळवून देण्याचा दावा करत असेल आणि पैसे मागत असेल तर जवळच्या पोलीस ठाण्यात अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे तक्रार दाखल करावी. तसेच महामंडळाचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
19. **अर्ज भरण्याबाबतच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. 8433902971/ 022-22151670/ 22151824 वरती कार्यालयीन वेळेत सकाळी 9.30 ते सांय. 05.30 वाजेपर्यंत संपर्क साधावा.**

**सही /-**

व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सु.म., मुंबई.